ISSN 2349-1027

UGC Approved International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# INDO WESTERN RESEARCHERS

(UGC Approved & Peer Reviewed Research Journal)

Year - V, Issue - IX, Vol. - VII | Impact Factor 3.47 (GRIFI) | Aug. 2017 To Jan. 2018

Krishnai Shikshan Prasarak Mandal, Latur's

## Janvikas Mahavidyalaya, Bansarola and ICSSR Sponsored

### NATIONAL SEMINAR

ON

## THE ROLE OF GOVERNMENT TO PROTECT THE HUMAN RIGHTS




EDITOR IN CHIEF

Dr. Babasaheb M. Gore

Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

IAP

Issue - IX, Vol. - VII

IWR

IMPACT FACTOR 3.47

ISSN 2349-1027

Aug. 2017 To Jan. 2018


| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 46 | मानवी जीवन आणि मानवाधिकार<br>**डॉ.राम प्रल्हाद तारे** | 194 |
| 47 | भारतीय संविधान आणि मानवी अधिकार<br>**प्रा.जयंत हंसराज मोरे** | 198 |
| 48 | भारतीय राज्यघटना आणि मानव अधिकार<br>**एस.एम.मुंडे** | 201 |
| 49 | मानव अधिकार आणि भारतीय राज्यघटना<br>**प्रा.डॉ. एन.बी. आघाव** | 203 |
| 50 | मानवी हक्क आणि भारतीय राज्यघटना<br>**प्रा. बाबुराव भिमराव जाधव** | 206 |
| 51 | मानवी अधिकार आणि भारतीय संविधान<br>**शिवशंकर कसबे** | 212 |
| 52 | दहशतवाद आणि मानवी हक्कांचे संरक्षण<br>**प्रा.डॉ. संगीता दत्ताजी मोरे** | 216 |
| 53 | मानव अधिकार आणि भारतीय राज्यघटना<br>**प्रा.डॉ. उमाकांत ज्ञानोबा वानखेडे** | 221 |
| 54 | भारतीय संदर्भात मानवाधिकार<br>**डॉ. राजेंद्र बंडु शेजुळ** | 226 |
| 55 | मानवाधिकार व त्याची व्याप्ती<br>**प्रा. के. जी. कुंभारकर** | 229 |
| 56 | मानवाधिकाराचे प्रकार<br>**प्रा. डॉ. संजय संदिपान चव्हाण** | 233 |
| 57 | भारतीय संविधान आणि मुलभुत अधिकार<br>**डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे** | 237 |
| 58 | मानवी हक्काचे प्रकार<br>**प्रा. विजयसिंग भावरदोडे** | 242 |
| 59 | महाराष्ट्रातील भटक्या जाती-जमातीचे मानवी हक्क<br>**जी.आर. कारिकंटे** | 245 |
| 60 | मानवी हक्क आणि भारतीय संविधान<br>**प्रा. डॉ. भुजंग विठ्ठलराव पाटील** | 248 |

Indo Western Researchers (IWR) (237)

IMPACT FACTOR 3.47

ISSN 2349-1027

Indo Western Researchers (IWR)

Issue : IX, Vol. VII

Aug. 2017 To Jan. 2018

www.irasg.com

Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

57

# भारतीय संविधान आणि मुलभूत अधिकार

**डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे**

समाजशास्त्र विभाग प्रमुख,

कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय,

सोनपेठ, जि. परभणी (महाराष्ट्र) भारत

आजपर्यंतचा मानवी इतिहास मानवाच्या प्रतिष्ठा प्रस्थापनेसाठीच्या प्रयत्नांचा इतिहास राहिला आहे. मानवाची प्रतिष्ठा ही त्याला प्राप्त होणाज्या स्वातंत्र्य आणि हक्कावर अवलंबून असते, म्हणून जगाच्या प्रत्येक कानाकोपज्यात मानसाला दास्यातून मुक्त करुन त्याला स्वातत्र्याचा उपभोग घेता यावा.यासाठी क्रांतीकारी लढे लढले गेले. निसर्गाने दिलेल्या अधिकाराची किमानपक्षी अनुभूती घेता यावी यासाठी हे मानवमुक्ती लढे होते. अमेरिकन राज्यक्रांतिपासून दक्षिण आफ्रिकेच्या स्वातंत्र्य अंदोलनापर्यतच्या प्रत्येक क्रांतिचा मुलाधार मानवी हक्काचा स्वीकार, संरक्षण आणि संवर्धन हाच होता.जगाने दोन महायुध्दाची विध्वसकता अनुभवल्या मानवी अस्तित्वाची आणि अधिकाराची जाणीव अधिकच जागृत झाली. जागतिक व्यवस्थेच्या केंद्रस्थानी 'माणुस' असला पाहिजे आणि 'मानवी हक्काचे' संवर्धन हे तत्व जागातील प्रत्येक राष्ट्राने अग्रस्थानी ठेवले पाहिजे ही धारणा १९४५ ला स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या निर्मितीमुळे अधिक दृढ बनली. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदे मध्येच उधृत करण्यात आले की, 'मुलभूत मानवी अधिकारांवरील निष्ठा पुन्हा दृढ करण्याचा...' हा युनोच्या सदस्य राष्ट्राचा निश्चत व्यक्त करण्यात आला आहे.

**शोधनिबंधाचा उद्येश :**

१ हक्क म्हणजे काय ? हे जाणून घेणे.

२ मानवी हक्क संकल्पना स्पष्ट करणे.

३ मानवी हक्काची आवश्यकता स्पष्ट करणे.

४ भारतीय संविधान आणि मानवी अधिकाराचा अभ्यास करणे.

५ महिलांचे मानवी अधिकार व सद्ययस्थितीची पडताळणी करणे.

६ भारतीय नागरीकांच्या हक्काचे सरंक्षण करण्यासाठी केलेले कायदे जाणुन घेणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंध अध्ययनासाठी दुय्यम साधन सामग्रीचा वापर केले आसून माहिती संकलन व विश्लेषणासाठी संदर्भ ग्रंथे, मासीके, वृतपत्रे व इंटरनेटचा आधार घेतला आहे.

**गृहितक :**

मानवीहक्क हे मानवी अधिकारांचे संवर्धन करण्यात बहूतांश प्रमाणात यशस्वी होत आहेत.

व्यक्तिच्या सर्वागीण विकासासाठी योग्य सामाजिक परिस्थिती निर्माण करुन देणे आवश्यक असते कारण की उचीत सामाजिक पर्यावरणातच व्यक्ती स्वतःचा विकास साधू शकतो. व्यक्तिविकासाठी आवश्यक असणारी सामाजिक परिस्थिती निर्माण करणे म्हणजे हक्क होय. हक्क म्हणजे केवळ व्यक्ति ची इच्छानाही तर ती उचित परिस्थीची मागणी होय. योग्य परिस्थितीत व्यक्ती स्वतःचा परिपुर्ण विकास करु शकतो म्हणून हक्क हे परिस्थितीची निर्मार्ती करताना ज्यामुळे व्यक्ति स्वतःच्या विकास करु शकतो. व्यक्तिच्या मागण्यांना समाज मान्यता लाभते आणि त्या मागण्यांचे हक्कात रुपांतर होते. 'अधिकार किंवा हक्क म्हणजे कायद्याने मान्य केलेली व्यक्तिची मागणी होय.'

१ हक्क हे व्यक्तिकडून स्वविकासासाठी समाजाचा घटक या नात्याने केलेली मागणी असते.

२ व्यक्तिने केलेल्या मागण्या या न्यायसंगत असतील तरच त्यांचे हक्कात रुपांतर होते.

३ व्यक्तिच्या योग्य मागण्यांना समाजहिताच्या दृष्टीने सामाजिक मान्यता जेव्हा प्रदान केली जाते तेव्हा त्या मागण्यांचे रुपांतर अधिकारात होते.

४ हक्कांना केवळ सामाजिक मान्यता असून चालत नाही तर त्या हक्कांना राज्याचे संरक्षण प्राप्त झाले पाहिजे कारण त्या शिवाय हक्काचा परिपुर्ण वापर व्यक्ती करु शकत नाही. म्हणूनच हक्काच्या अंमलबजावणीसाठी राज्याच्या कायद्याचा पाठींबा आवश्यक ठरतो.

५ हक्क हे स्पष्ट व निश्चित असावेत तरच त्याचा उपयोग व्यक्ति करु शकतो.

६ धर्म जात, वंश, वर्ग, लिंग, भाषा, व या मध्ये भेदभाव न करता समाजातील प्रत्येक व्यक्तिला समानहक्क प्रदान केले जातात.

७ मानसांच्या गरजा जशा वाढतात तसे हक्क विकसीत होत जातात.

८ हक्क हे सुसंघटीत समाजातच प्राप्त होतात.

९ हक्क आणि कर्तव्य हे परस्परपुरक असतात. त्यामुळे कोणत्याही समाजात फक्त हक्कच प्रदान केले जात नाहीतर त्यासोबत व्यक्तिला कर्तव्य पार पाडावी लागतात.

१० हक्क सावेक्षतावादी असतात स्थळ, काळ परिस्थिती नुसार त्यांच्यात बदल करावे लागतात.

११ हक्क दंडशक्तीचा आधार असतात. व्यक्तिच्या अधिकाराचे हनन झाल्यास व्यक्तीला राज्याकडे दाद मागता येते आणि हक्क हिसकावणाज्या व्यक्ति, समुहास राज्याकडून दंड दिला जातो.

१२ कोणतेही हक्क हे अनिर्बंध व अमर्याद नसतात तर उचीत बंधने हक्कांवर असतात. मानवाला आत्मविकास साधन्यासाठी काही अधिकारांची आवश्यकता असते. अधिसत्तावादी

समाजात व्यक्तिंच्या अधिकारांची मान्यता नव्हती परंतु लोकशाहीत मात्र व्यक्तिसाठी अधिकाराचा अंगीकार केला आहे. 'कोणत्याही देशाचा वा राज्याचा दर्जा तेथील नागरिकांना राज्य किती अधिकार देते या वरुन ठरतो' असे लास्की यांचे मत आहे.

भारतीय संविधान जगातील सर्वोत्कृष्ट संविधानापैकी एक संविधान आहे. इतर राष्ट्राचा संविधानाचा अभ्यास करुन भारतीय परंपरा व संस्कृतीला पुरक अशा स्वरुपात त्यांचे रुपांतर करुन भारतीय संविधान तयार करण्यात आले आहे. कोणत्याही राष्टाचे संविधान हे त्या राष्ट्राचा पवित्र कायदा असतो. नागरिकांच्या सामाजिक आर्थिक, राजकीय,जीवनाच्या सुरक्षिततेसाठी हमी संविधानाने दिलेली असते.

**समतेचा अधिकार (कलम १४ ते १८) :**

या कलमान्वये प्रत्येक व्यक्तिला समानतेचा हक्क मिळाला असून कोणत्याही प्रकारच्या भेदभावास पुर्णत: बंदी घालण्यात आली आहे. कलम १४ - कायद्यापुठे समानता, कलम १५ भेदभाव अमान्य, कलम १६ समानतेची संधी, कलम - १७ अस्प्रश्यता निवारण, कलम १८ कोणत्याही व्यक्तिला पदव्या देण्यास शारणावर बंदी.

**स्वातत्र्याचा अधिकार (कलम १९ ते २२) :**

या कलमान्वये प्रत्येक व्यक्तिला व्यक्तिला अभिव्यक्ती स्वातत्र्य , संचार स्वातत्र्य, व्यवसाय स्वातत्र्य , जीविताचे स्वातत्र्य इ. सर्व प्रकारचे स्वातत्र्य मिळाले आहेत.

कलम - १९ नुसार भाषण व विचार स्वातत्र्य, शांततापुर्वक सभा भरवण्याचे स्वातंत्र्य, संघटना स्थापनेचे स्वातत्र्यं, भारतात सर्वत्रसंचार स्वातत्र्य , भारतात कुठेही राहाण्याचे व स्थाईक होण्याचे स्वातंत्र्य, संपत्ती मिळवीणे, बाळगणे व खर्च करण्याचे स्वातंत्र्य कोणताही व्यापार व व्यवस्था करण्याचे स्वातंत्र्य.

कलम २० - गुन्ह्याबद्दल दोषी ठरविण्याचे बाबत संरक्षण

कलम २१ - जीविताचे व व्यक्ति स्वातंत्र्याचे सरंक्षण

कलम २२ - अटक व तरुगांपासून संरक्षण

**शोषणा विरुध्दचा हक्क (कलम २३ ते २४) :**

या कलमान्वये व्यक्तिंना कोणत्याही प्रकारच्या शोषणाला बंदी घालण्यात आली आहे.

कलम - २३ क्रय, विक्रय, वेठबिगारी, गुलामगिरी यापासून मानवाचे सरंक्षण व शरिरविक्रय बंदी

कलम २४ - १४ वर्षाखालील मुलामुलीस खाणी वा तत्सम धोक्याच्या ठिकाणी कामावर येण्यास बंदी.

धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क (कलम २५ ते २८) :

या कलमान्वये व्यक्तिला सर्व प्रकारच्या धार्मिक स्वातंत्र्य देण्यात आले आहे. कलम २५ - या कलमानुसार सार्वजनिक हितास बाधा येणार नाही अशा दृष्टीने प्रत्येक व्यक्तिस कोणताही धर्म स्विकारण्याचे व त्याचा प्रचार करण्याचे स्वातत्र्य आहे.

कलम - २६ या कलमानुसार धार्मिक संस्थाची चल व अचल संपत्तीची मालकी स्विकारण्याचा व तिची व्यवस्था पाहण्याचा अधिकार कायद्याने शासनास मिळाला आहे.

कलम -२७ कोणत्याही धर्माच्या प्रसारासाठी सक्ती पैसा गोळा करण्यास बंदी

कलम - २८ शिक्षण संस्थातुन धार्मिक शिक्षण देण्यास बंदी

सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार (कलम २९ ते ५०) :

कलम -२९ या कलमानुसार भारतीय कोणत्याही व्यक्ति वा त्यांच्या समुहाला स्वत:ची भाषा लिपी तसेच संस्कृती यांचे जतन करण्याचा अधिकार आहे.

कलम - ३० या कलमान्वये आल्पसंख्यांक जातीना स्वेच्छे नुसार धर्म व भाषा या आधारे शिक्षण संस्था चालविण्याचा अधिकार.

मालमत्तेचा अधिकार (कलम ३१) :

भारतिय संविधानातील कलम १९,३१ अन्वये मालमत्तेच्या अधिकारांची तरतुद करण्यात आली होती. त्यानुसार व्यक्तिला संपत्ती मिळविण्याचा, तीचा उपभोग घेण्याचा तसेच त्या संपत्तीची विल्हेवाट लावण्याचा हक्क प्रत्येक भारतीय नागरिकांस देण्यात आला.

घटनात्मक उपाययोजना हक्क (कलम ३२ ते ३५ व ३५९) :

भारतीय नागरिकांना वर स्पष्ट केलेल्या अधिकारापैकी पहिल्या पाच अधिकाराचे संरक्षण करण्यासाठी, त्या अधिकाराचा संकोच झाल्यास त्याविरुध्द दाद मागण्यासाठी कलम ३२ ते ३५ अन्वये घटनात्मक उपाययोजना करण्याचा हक्क प्रदान करण्यात आला आहे.

**महिलांचे मानवी अधिकार :**

संपूर्ण मानव जातीच्या शांततामय प्रगतीशील , उन्नत जीवन गतता यावे म्हणून मानवी हक्क वा अधिकाराची तरतुद करण्यात आली असली तरी प्रत्यक्षात मात्र वेगवेगळ्या देशात वेगवेगळ्या पध्दतीने मानवी हक्काचे उल्लघन केले जाते आणि त्यात महिलांवर अन्याय, आत्याचार, शोषण ही एक गंभीर समस्या बनली आहे. परिणामी त्यांचा शैक्षणिक, सामाजिक,अर्थिक, सांस्कृतीक, कला, क्रिडा, राजकीय. वैज्ञानिक अशा सर्वच क्षेत्रातील विकास नाकारला जात आहे

भारतीय समाज व्यवस्थेत स्त्रियांचे स्थान नेहमीच दुय्यम ठरविले जात असले तरी राज्यघटनेतील कलम १४,१५,१६,३९ या कलमाच्या माध्यमातून स्त्रियांना समानहक्क प्राप्त करुन देण्यात आलेले आहेत. राज्यघटनेतील या सर्व तरतुदीना अनुसरुन भारत सरकारने वेगवेगळे कायदे केलेले आहेत. यात सतीबंदी कायदा, मातृत्वलाभ अधिनियम , हुंडाप्रतिबंधक कायदा, समान वेतन कायदा, गर्भलिंग परिक्षण बंदी कायदा, कैटुंबि हिसांचार विरोधी कायदा, इ. प्रकारचे कायदे महिलांच्या विकासासाठी करण्यात आले आहेत.

**मानवी हक्क कायदे :**

मानवी अधिकारांचे , हक्कांचे संरक्षण तसेच संवर्धन करण्यासाठी मानवी हक्क आयोग, मानवी हक्क न्यायालये, मानवी हक्काविषयीच्या घटनात्मक तरतुदी इत्यांदी शिवाय मानवी हक्काच्या संरक्षणासाठी तसेच अम्मलबजावणी साठी भारतात आतापर्यंत पुढील प्रकारचे कायदे करण्यात आले आहेत. नागरी हक्काच्या सुरक्षीतेत चा कायदा (१९५५) स्त्रि भेदभाव विरोधी हक्क कायदा (१९७९), अमानवी वर्तणुकी विरोधी शिक्षा कायदा (१९८४), मानवी हक्कांच्या उल्लघनामुळे होणाऱ्या अतिदृष्ट,

घातकी, भयानक कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी वर्गीकृत, जाती वर्गीकृत जमातीसाठी केलेला कायदा (१९८९), बाल हक्क कायदा (१९७९), राष्ट्रीय महिला आयोग कायदा (१९९०), अल्पसंख्याकासाठीचा राष्ट्रीय आयोग कायदा (१९९२) लादलेले भुमीगत होणे पासून संरक्षण कायदा (१९९२) राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग कायदा (१९९३) दुर्बल, अपंग, अपात्र लोकांना समानसंधी, हक्कांचे संरक्षण, पुर्ण सहभाग प्राप्त होण्यासाठी केलेला कायदा (१९९५) सर्व प्रकारचे वांशिक भेद रोखणे तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नागरी, सामाजिक, आर्थिक सांस्कृतीक तसेच राजकीय हक्क सरंक्षण कायदा

**सारांश :**

भारतीय मानवी हक्काच्या सुरक्षिततेसाठी तसेच त्यांची प्रभावी व यशस्वी आमलबजावणी व्हावी यासाठी राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, राज्य मानवी हक्क आयोग, मानवी हक्क न्यायालय, मानवी हक्क विषयक कायदे संमत केले असले तरी प्रत्यक्षात मानवी हक्का विषयी समाजात फारशी जाणीव जाग्रती निर्माण झालेली दिसत नाही. सध्या काही स्वाचत्त स्वयंसेवी संस्था मानवाधिकारासाठी प्रयत्नशिल असलेल्या तरी त्यांचा प्रभाव महानगरे तसेच शहरीभागातच दिसून येतो. त्यामुळे ग्रामीण , आदिवासी, विशेषत : दुर्बलांच्या तसेच स्त्रिया, बालके, कामगार , शेतमजुरांच्या हक्कांची पायमल्ली होतांना आढळते. स्त्रिया, बालके, कामगार यांच्या सोबत मानवी प्रतिष्ठा, रोजगार, पर्यावरण, आरोग्य व शिक्षण यांचे ज्या प्रकरणात उल्लंघन होते

## संदर्भ सूची :-


१) डॉ. सोलापुरे राजशेखर , मानवी हक्क आणि समाज, अरुणा प्रकाशन लातुर, डिसेंबर २०१४, पान नं. ९,१०,११,५७

२) डॉ. निकुंभ दिलीपसिंह डॉ. मोरे सुरेद्र, भारतीय संविधान , प्रशांत पब्लीकेशन, सप्टेंबर २०१६, पान नं. १२३, १२४, १३३, १३४,

३) Role of human right in the empowerment of women, Editor Dr. Deshmukh, Dr. Andhapurkan Aruna Paekshan, Latar, P.N. १६२ to १६५

४) डॉ. कुलकर्णी विजयकुमार , भारतीय संविधान : शासन आणि राजकारण, कैलाश पब्लीकेशन , औरंगाबाद, २००४ पान नं. ११

५) डॉ. पाटील, डॉ. आघाव, प्रा. शाकीर, राज्यशास्त्रीची मुलतत्वे , कैलाश पब्लीकेशन औरंगाबाद, २००९, पान नं. १००

६) ॲड. के . टी. ॲण्ड सन्स , भारताचे संविधान , औरंगाबाद, जाने २०००, पानं. ५५

७) डॉ. शेंडे कृष्णा , समाजकल्याण आणि सामाजिक अधिनियम, क्रिष्टीव्ह पब्लिकेशन, नांदेड, पान नं. २९,३०

८) योजना मासिक , ऑगस्ट, २०११ 'भारतीय नागरीकांचे हक्क, कर्तव्य, आणि जबाबदाऱ्या ', डॉ. भगवान माने पानं. ५९


PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani